Bapujinchi Janata Rajyat Pherphatak
Shayam Mokashi

# बापूजींचा जनता राज्यात फेरफटका !

गांधीजी म्हणाले, मोरारजींकडे जायचं. म्हटलं चला. पण ते आता झोपले असतील.

'आपण त्यांना स्वप्नातच भेटायचं '

'स्वप्नात ? का ?

'स्वप्नात माणसं खरं बोलतात !'

० ० ०

मोरारजीभाई ताठ बसले होते. आम्ही पुरते त्यांच्या-पुढे यायच्या आतच त्यांनी सुरवात केली. जे व्हायचंय ते कायद्यानेच होईल. आकसाने कोणतीही कारवाई होणार नाही. अरे बापूजी ? माफ करा. बापूजी. सध्या हेच सारखं...!

'ठीक आहे ठीक आहे. मोरारजी, शेवटी तू पंत-प्रधान झालास तर. ज्योतिष्यानं सांगितलेलं खरं ठरलं. आता पुढे काय करणार आहेस ?'

'या भारतवर्षात पुन्हा रामराज्य आणणार '

'आणि रोजी रोटी केव्हा देणार '

'रामराज्य आलं म्हणजे त्यात रोजी रोटी आलीच'

'बरं ! रामराज्य कधी आणणार आहेस ?'

'आता हळूहळू...'

'कुठून आणणार आहेस ? '

'हे काय म्हणताहात बापू ? भारतीय संस्कृतीमधून, भारतीय परंपरेतून निर्माण झालेलं, तुमच्या स्वप्नातलं'

'म्हणून तर तुला विचारतोय मोरारजी. ते हळूहळू येणार आहे ना, मग त्यापैकी रोटी कधी येणार आहे ? कपडा, मकान, औषध, शिक्षण—'

'हां हां ! सगळं आमच्या लक्षात आहे. आमच्या योजना आहेत. '

'म्हणजे हिमालयातलं पाणी वापरण्याच्या. कुटिरो-द्योग सुरू करण्याच्या.'

'तुम्हाला सगळं माहित आहे बापू ?'

'पण नशाबंदीचं कशाला काढतोयस मधेच ?

'अँ ?'

'अमणा तमने शूं कहवाय ? मोरारजी, नशाबंदीचा माझा आग्रह खूप जोरदार होता. अजूनही आहे. पण त्यासाठी सरकार हट्ट धरू शकत नाही. ती कार्यकर्त्यांची चळवळच राहिली पाहिजे. लोकांनी आपण होऊन पत्क-रली पाहिजे. तू आता रशियाला जाणार आहेस. तिकडे बघ. सरकारने हट्ट नाही धरला. उलट चांगली दारू मिळेल अशी सोय केली. त्याचबरोबर लोकशिक्षण केलं.'

'आता काय सांगू बापू ? या आतल्या गोष्टी–' मोरारजी हताशपणे म्हणाले. आणि त्यांनी माझ्याकडे बघितलं.

'मोरारजी, हा एक सर्वसामान्य नागरिक आहे. ज्याच्या कल्याणासाठी हे राज्य चालायला पाहिजे. पण त्याला तर तुम्ही साधं विश्वासात सुद्धा घेत नाही.' गांधीजींचा चेहरा कष्टी झाला. 'लोक काय म्हणतात ते पहात जा मोरारजी !'

एकदम मोरारजींनी कूस वदलली आणि त्यांचं स्वप्न संपलं.

० ० ०

आमच्या सभोवार रंगाचे, धुळीचे, धुराचे लोट निघत होते. आवाजाचा कल्लोळ चालला होता.

'ही कसली खळबळ ? '

'हे चरणचं स्वप्न आहे. '

आम्ही पुढे गेलो. चौधरी चरणसिंग डोळे मिटून

विचारात गढले होते. तीन बोटं त्यांनी हनुवटीला टेकवली होती.

'चरण'

चरणसिंगांनी डोळे किलकिले करून बघितलं. थोडे हसले. 'बापू ?'

'हं !'

'मला नेहरूंचं पहिल्यापासनं पटत नव्हतं. सरदार पटेल मध्येच गेले नसते तर... '

'ते सोड चरण. सध्या काय चाललंय ? लोक काय म्हणतात ?'

'बापू, अन्न हाच भुकेल्या माणसाचा देव असतो. मला तुमचं सगळं आठवतंय.'

बापूजी हसले 'चरण, तू लढाऊ बाण्याचा. तुझ्या प्रकृतीत बसतं का हे ?'

'लढाऊपणा आहेच बापू. उगीच नाही या चांडाळ चौकटीच्या नि कुदाळ कंपूच्या मागे लागलो. अजून काय झालंय ! आता पुढे बघा. पण बापू, हा आपद्धर्म झाला. माझ्याकडे अधिकार आहे म्हणजे जबाबदारी आहे. अधर्माचा नाश करण्याची. खरा मी शेतकरीच. आपल्या संस्कृतीचा कणा म्हणजे शेतकरीवर्गच आहे ना ? आमचीच शांतताप्रियता आपल्या संस्कृतीत उदात्तीकरण होऊन अहिंसा बनली ना ?'

'चरण, जेव्हा शेतीचं तंत्रज्ञान आणि उत्पादन यांची पातळी त्या काळात जेवढी शक्य होती तेवढी वाढली तेव्हा मग माणसाचं मन काबूत ठेवण्याच्या गोष्टी सुरू झाल्या. आज तुला काय दिसतंय ?

'ग्रामोद्धाराचं कार्य ...'

'चरण ! ग्रामोद्धार म्हणजे मुख्यतः शेतीचा उद्धार. शेतीची पुनर्रचना. ती करणार आहेस ? आत्ता तुम्ही लोक जे करीत आहात त्यातून काय साधणार ?

'पण बापू, माझा रोख उद्योगधंद्याला जे जादा महत्त्व मिळालं आणि नको त्या सवलती मिळाल्या त्यावर आहे. योग्य त्या दिशेने उद्योगधंद्याची वाढ झाली पाहिजे. शेतीला पूरक असंच त्याचं स्थान राहिलं पाहिजे.'

'म्हणजे काय करायचं ? आंतरराष्ट्रीय कंपन्यांना आणायचं ? आणि ते करताना भारत हेवी इलेक्ट्रिकल सारख्या सरकारी कारखान्यांना मारायचं ? चरण, परदेशी तज्ञ आणि त्यांचे पाठीराखे यांचे म्हणणे तुम्ही ऐकू नका. लोक काय म्हणतात त्याकडे लक्ष ठेवा. लोकांना आंतरराष्ट्रीय कंपन्यांची बदमाषी कळत नसेल साम्राज्यवाद्यांची कारस्थानं त्यांना माहीत पडत नसतील; पण त्यांना त्यांच्यासमोरचा माणूस काय आहे ते बरोबर कळतं. सांगता येणार नाही त्यांना, पण कळतं मात्र नक्की ! त्यांना शब्द जुळवता येत नाहीत म्हणून ते तमची पोपटपंची ऐकत राहतात; मग म्हणतात, देऊ यालापण एक संधी.

'चरण, अशी संधी तुम्ही घेतलीत. आता शेतीची वाढ कशी करायची ते अजून कोणीच बोलत नाही व्यापारी आणि परकीय बड्या कंपन्या यांना मात्र आतापासूनच मोकळं रान दिलंय. पिकंबिकं चांगली आली म्हणून देशातील लोकांचे जे आर्थिक उत्पन्न वाढेल ते हेच लोक खाऊन जातील. मग सरकारला पैसा पुरायचा नाही. वाहेरून आणावा लागेल.

'आणि चरण वाहेरचा कोणीही आत येईल जो स्वतःच्या फायद्यासाठी. मग आता असं सांग, हे राज्य कुणाच्या भल्यासाठी चालवलं जाणाराय ! इथल्या सर्वसामान्य माणसासाठी की मूठभर व्यापारी आणि परकीय कंपन्यासाठी.

'आणि चरण, जर या सरकारचा सर्वसामान्य माणसाला काही उपयोग नसेल तर तो हे टिकू देईल का ? तुम्ही जनतेच्या संतापाचे प्रतीक आहात. आता जर तुम्ही जुलमाचे प्रतिनिधी झालात, लोकाना संतुष्ट केलं नाहीत तर काँग्रेसपेक्षा जास्त वेगाने इतिहासजमा व्हाल.'

'पण बापू, अजून आम्ही एकसंघदेखील झालो नाहीत. आम्हाला थोडा तरी वेळ द्या !'

'मी कोण देणार ? तुम्हाला लोकांनी राज्य दिलं. तुम्ही सगळे अनुभवी आहात. आता जर तुमच्यात एकवाक्यता नसेल तर कुठंतरी प्रामाणिकपणा कमी पडतोय.'

'चरण, तू स्वतःपासुन विचार कर. तू हरिजनांचा द्वेष करतोस असं मी म्हणत नाही. तू मुख्यमंत्री होतास तेव्हा तुझ्या मंत्रीमंडळात हरिजन मंत्री होते. तू बड्या शेतकऱ्यांचाच विचार करतोस असंही मी म्हणत नाही पण मग तुझ्याबद्दल हे दोन्ही समज का पसरले!

नेता म्हणून अजून तुझी जी प्रतिमा नाही ती तुमच्यात काही कमी पडतं...'

चरणसिंगांचा चेहरा अधिकच निश्चयी बनला. 'मी काय आहे ते लोकांना दाखवायची संधी उशीरा मिळाली. पण मी दाखवून देईन.'

'मग तर फारच चांगलं होईल. पण चरण, पक्ष बांध करायचा तो दुसऱ्यांना सामावून घेऊन. त्यांना दूर ढकलून नव्हे.'

एवढ्यात सगळीकडून मोठीच खळबळ आली. आम्ही एकमेकांना दिसेनासे झालो.

० ० ०

सगळीकडे अंधार. खांद्यावर गांधीजींचा हात तेवढा जाणवत होता. मी म्हटलं,

'महात्माजी, जागं केलंत ते केलंत. आता या लोकांच्यामागे का लागला आहात ?'

'अरे, मी म्हणजे त्यांचे जागेपणातलं भांडवल आहे, पण झोपेतली टोचणीच आहे.'

'पण आम्हाला म्हणजे तरुण पिढीला तुमच्या कार्याचे मर्म किंवा तुमची मूलभूत वैचारिक बैठक कधी नीटशी सांगितलीच गेली नाही. तुम्ही काहीतरी आमच्या आधी करून गेला आहात म्हणून थोडाफार आदर वाटतो. पण तुमचं म्हणणं काय होतं, वगैरे काहीच माहीत नाही. ही आताची तुमची लाईन म्हणजे ग्रेटच आहे. आज तुम्ही असायला पाहिजे होतेत. सगळी पोरं तुमच्यामागे आली असती.'

'असं बघ, जसा काल जाईल तसा माणूस सुधारत जातो. माझ्या अनेक चुका मला दिसतात. आता त्या सुधारणं तर आता शक्य नाही. पण बोलणं सुधारू शकतं; तेवढं करतोय.'

तेवढ्यात खालून कुठून तरी हसण्याचा कोरस आला. मी खाली पाहिलं. एका सुरेखशा दिवाणखान्यात दहा-बारा लोक बसले होते. निरनिराळ्या प्रकारची मद्ये सगळीकडे पसरली होती. काही क्षण गेले आणि दोन-चार मदिराक्षी तिथे प्रकटल्या. लगेच गांधीजींनी मला झापला.

'हे त्या स्वामीचं स्वप्न आहे. आणि हे सगळे त्यानं सांगितलेले दारुबाज मंत्री आहेत. तू त्यांच्यात या बायका घुसडून आणखी गोंधळ माजवू नको. पाहिजे असेल तर आपण तिकडे जाऊ.'

'नको नको. दारूच्या अंमलात माणूस वाटेल ते बोलतो.'

'तू त्या बोलण्याला घाबरतोस ?'

'छे ! पण उगीच वैतागात भर कशाला ?'

बापूजी काही बोलणार तेवढ्यात त्यांचं लक्ष खाली गेलं. 'अरे, चल, चल.'

थोडे घाईतच आम्ही जॉर्ज फर्नांडिस यांच्या श्रोत्यां-मध्ये उतरलो. जॉर्ज चक्क चकित. आणि अवाक्.

गांधीजी क्षमाशीलपणे हसत म्हणाले, 'जॉर्ज, तुमने तो कमाल कर दिया. तू युनियनवाला. पण खेड्यात कोकाकोला मिळतो पण पाणी मिळत नाही असं तू बोललास तेव्हा तुझी सहानुभूती किती सर्वस्पर्शी आहे मला कळलं. तू परवा परदेशात गेला होतास ना ? तिकडे 'सोशालिस्ट इंटरनॅशनल'च्या कचेरीच असंच काहीतरी बोललास काय ?'

बघता बघता जॉर्ज फर्नांडिस यांचा चेहरा जांभळा आणि अस्पष्ट होत गेला. मी विचारलं,

'बापूजी, हे काय ? जॉर्जबरोबर काहीच बोलणं झालं नाही. खरं म्हणजे बोलण्याची हौस त्यांना एवढी आहे—'

'अरे, त्यांचं भाषणाचं स्वप्नं संपत आलं होते. म्हटलं त्याचा शेवटचा परिच्छेद तरी उडवावा.'

'आता कुणाकडे जायचं ?'

'देवरसांकडे.'

० ० ०

बाळासाहेब देवरसांच्या स्वप्नात सगळीकडे फुलं पसरलेली होती. फुलांच्या माळा लोंबत होत्या. एक वेगळाच प्रकाश सगळीकडे भरून राहिला होता.

'हे लायटिंग कसलं ?' मी विचारलं.

'हे दिव्य तेज आहे.'

'आपल्याकडे पूर्वी असंच तेज असायचं ?'

'तू खरोखरच अडाणी नसतास ना, तर मी नक्की म्हटलं असतं की तू भोचक आहेस.'

तेवढ्यात समोरून संथपणे चालत बाळासाहेब आले.

'काय सरसंघ चालक ?' गांधी म्हणाले.

'महात्माजी, आपण आलात, संघाबद्दल आपला गैरसमज झालेला नाही हे पाहून फार बरं वाटलं.'

'बाळासाहेब, आतापर्यंत संघाची तपश्चर्या चालली होती. आत्मक्लेश चालले होते. आता त्याला गोड फळं मिळताहेत. मला आनंदच आहे. पण लोक काय म्हणताहेत ?'

'अजून हितसंबंधी गटांचा गदारोळ चाललाच आहे. पण बऱ्याच लोकांचे गैरसमज दूर झाले आहेत. शेवटी प्रत्यक्ष विधायक कार्य हाच सर्वात मोठा प्रचार असतो.'

'म्हणजे ? संघ कार्य करायला लागला का ?'

'म्हणजे काय ? संघ ही प्रथमपासूनच सेवाभावी संघटना आहे–हां हां. म्हणजे आपला रोख 'सांस्कृतिक' या शब्दावर आहे ! पण महात्माजी, सांस्कृतिक क्षेत्रातदेखील करण्यासारखं खूप आहे आणि संघानं ते केलंही आहे.'

'सांस्कृतिक–म्हणजे धार्मिक ?'

'अं ऽ तसं नाही म्हणता येणार –'

'मग– साहित्य कला वगैरे ?'

'अं ऽ तसं पण नाही –'

'मग– ऐतिहासिक ?'

'महात्माजी, संघात ही सारी अंगे आहेत. इतरही काही आहेत. संघाचं कार्य कौटुंबिक-वैयक्तिक पातळीवर चालतं, क्रीडांगणावर चालतं, शिक्षणक्षेत्रात चालतं. पण संघ सगळ्यात गुंतून राहाणार नाही. त्याला भविष्याचा वेध घ्यायचा आहे. एक बलवत संस्कृती, एक बलवान राष्ट्र यांची उभारणी करायची आहे.'

'मग त्यातल्या आर्थिक आणि सामाजिक अंगाकडे संघाचं दुर्लक्ष का ?

'महात्माजी, ही फार निसरडी समस्या आहे. या क्षेत्रात तुम्ही पाऊल टाका; थोड्याच काळात तुम्ही राजकारणात ओढले जाता. आणि संघाला राजकारण करायचं नाही.'

'बाळासाहेब, संस्कृती केवळ पैशावर उभी नसते हे बरोबर आहे. पण त्याला मोठं महत्त्व समाजजीवनात आहे हे निःसंशय. आणि असं पहा, राजकारणात ओढले जाणार म्हणून जर तुम्ही हे टाळत असाल तर ते योग्य नाही. आवश्यक असेल तेव्हा राजकारण देखील केलं पाहिजे. स्वतःचा, सत्याचा शोध करताना राजकारण अनेकदा एक आवश्यक कार्य बनतं.'

'तसे आम्ही या बाबींकडे दुर्लक्ष करीत नाही. [illegible] संघासाठी आम्ही आमचे निवडक स्वयंसेवक दिले. आता आणीबाणीनंतर प्रसंग आला तेव्हा तुमचा धार्मिक विचार आम्ही स्वीकारला. आता इतर धर्मीयांसाठी देखील एक वेगळी 'विंग' काढायचा विचार चाललाय. या संदर्भात आपण जे म्हटलं होतं की एक चांगला हिंदू बनूनच मी मुसलमान बंधूंची चांगली सेवा करू शकेन, ते मला योग्य वाटतं.'

'तुम्ही जे करत आहात त्याचा मला आनंदच आहे. पण तुम्ही जे करत नाही त्याचं दुःखही आहे. बाळासाहेब, आतापर्यंत तुम्ही जी दीनदुबळी माणसं पाहिलीत त्यातला सगळ्यात जास्त पिचलेला, नाडलेला माणूस आठवून पहा, आपण आतापर्यंत जे कार्य केलं आहे त्यामुळे त्या आणि त्याच्यासारख्या माणसांचं दुःख, त्यांची दैना कितीशी कमी झाली याचा विचार करा. बाळासाहेब, मी दीन दुबळ्यांसाठी खूप काहीतरी केलं असं लोक मानतात. पण माझं मला कळतंय, की मी फारसं काहीच केलं नाही.

'महात्माजी, मी आपल्या भावना जाणतो. आपली जी संकल्पना होती ती प्रत्यक्षात आणण्यासाठी संघ बद्धपरिकर आहे.'

'मग बाळासाहेब, हरिजनांवर जे अत्याचार होतात त्यांचा प्रतिकार संघ का करत नाही? हिंदुसमाजातल्या एका गटानं दुसऱ्या गटाला वाटेल तसं पायदळी तुडवायचं आणि तुम्ही ते नुसतंच बघत बसायचं हे काही बरोबर नाही. हिंदुसमाजात पूर्णपणे समता निर्माण केल्याशिवाय संघाचं घर तरी भक्कम कसं होईल ?

बाळासाहेब विचारमग्न झाले, 'हो. अलिकडे अशा प्रकारचे प्रश्न नव्या स्वयंसेवकांमधून सुद्धा यायला लागले आहेत. त्याचा एकदा स्पष्ट खुलासा करायला लागणारच आहे.'

तेवढ्यात पलिकडून चाहूल आली. आणि कुणीतरी म्हणाला,

ते गुरुपूजनाचं विचारत होते–'

जरा एक मिनिट हं' बाळासाहेब वळले.

चल. हे स्वप्न भरकटलं' बापूजी म्हणाले. आम्ही बाहेर पडलो.

० ० ०

खाली पृथ्वीचा गोल जाणवत होता. मी खाली पाहिलं. तीन प्रकाशमान बिंदू तीन [illegible] [illegible] होते.

'ते काय ?' मी विचारलं.

'इंदिरा, विनोबा आणि डांगे. त्यांचं ट्रॅन्सेडेंटल मेडिटेशन चाललंय.'

'आं ?'

'म्हणजे दिव्य दृष्टीसारखं समज.'

'हॅं ! तुम्ही थट्टा करताहात'

'विचार त्यांना.'

छान ! गांधीजीपण गुरू भेटले. आता या तिघांपैकी कोणी एखादा काय आपल्या वाटेवर पडलाय?

'तुम्ही पण असं करायचात ?'

'नाही'

'मग आता कुणाकडे जायचं ?'

'आता तुला सुट्टी !' गांधीजींनी हसून मला लोटत म्हटलं.

मी जागा झालो.

-- श्याम ज. मोकाशी

